# बृहन्मुंबई महानगरपालिका

## परिपत्रक

विषय:- ईद-ए-मिलाद या सणाची गुरुवार दि.२८ सप्टेंबर,२०२३ ऐवजी शुक्रवार दि.२९ सप्टेंबर,२०२३ रोजी सार्वजनिक सुट्टी जाहीर करणेबाबत.

संदर्भ:- १) शासन निर्णय क्र.GAD-४९०११/२/२०२३/GAD/DESK-२९ दि.२७ सप्टेंबर २०२३
२) प्रकाअ/ ०९/२०२२-२०२३ दि .०२.०१.२०२३
३) प्रकअ/१४७/सर्वसा/(एमओपी/३०८६) दि.३०.१२.२०२२

उपरोक्त संदर्भित शासन निर्णयानुसार ईद-ए-मिलाद हा मुस्लिम धर्मियांचा सण मुस्लिम बांधव मोठ्या प्रमाणात साजरा करत असतात. यावेळी जुलूस कार्यक्रमाचे आयोजन करण्यात येते. तथापि यावर्षी गुरुवार,दि.२८ सप्टेंबर,२०२३ रोजी हिंदु धर्मियांचा अनंत चतुर्दशी हा सण आहे.अनंत चतुर्दशीच्या दिवशी राज्यात सर्वत्र सार्वजनिक गणेश मुर्तींची मोठी मिरवणूक काढण्यात येते व नंतर तिचे विसर्जन करण्यात येत असल्याने हिंदु बांधवांची मोठी गर्दी जमा होत असते.यामुळे दोन्ही समाजामध्ये शांतता व सामाजिक सलोखा कायम राहण्याच्या हेतूने ईद-ए-मिलाद ची सार्वजनिक सुट्टी ही गुरुवार दि.२८ सप्टेंबर,२०२३ ऐवजी शुक्रवार दि.२९ सप्टेंबर,२०२३ रोजी सार्वजनिक सुट्टी जाहीर करण्यात येत आहे.

त्यानुसार बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या ठाणे जिल्ह्यातील महानगरपालिका कार्यालयांसह, मुंबईतील बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या कार्यालयातील कामगार/कर्मचा-यांना उपरोक्त संदर्भाधिन क्र.२ येथील परिपत्रकाच्या अधिन राहून (सफाई,रुग्णालये, दवाखाने, प्रसुतीगृहे,जलकामे, विद्युत धुलाई केंद्र, अग्निशमन, उदंचन केंद्र, सुरक्षा, देवनार पशुवधगृह,आपत्कालीन व्यवस्थापन हया अत्यावश्यक सेवा वगळून) दि .२८.०९.२०२३ ची ईद-ए-मिलाद निमित्तची सार्वजनिक सुट्टी ऐवजी दि.२९.०९.२०२३ रोजी ईद-ए-मिलाद या सणानिमित्त सार्वजनिक सुट्टी राहील.

तसेच, बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या परिपत्रक क्र.प्रकअ/१५१/सर्वसा/(एमओपी/३०८२) दि ०२.०२.२०२३ अन्वये अनंत चतुर्दशी निमित्त गुरुवार दिनांक २८ सप्टेंबर २०२३ रोजी बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या ठाणे जिल्ह्यातील महानगरपालिका कार्यालयांसह, मुंबईतील बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या कार्यालयातील कामगार/कर्मचा-यांना (सफाई,रुग्णालये, दवाखाने, प्रसुतीगृहे,जलकामे, विद्युत धुलाई केंद्र, अग्निशमन, उदंचन केंद्र, सुरक्षा, देवनार पशुवधगृह,आपत्कालीन व्यवस्थापन हया अत्यावश्यक सेवा वगळून) स्थानिक सुट्टी जाहीर करण्यात आली आहे,याची नोंद घ्यावी.

प्रस्तुत परिपत्रक http://portal.mcgm.gov.in आणि ftp://hr.mcgm.gov.in/circular/GAD/ChPO/MOP/२०२३ या संकेतस्थळांवर उपलब्ध करण्यात येत आहे.

| | | | |
|---|---|---|---|
| सही/- २७.०९.२०२३ | सही/- २७.०९.२०२३ | सही/- २७.०९.२०२३ | सही/- २७.०९.२०२३ |
| (श्रीम.रिमा सु.ढेकणे) | (श्री.मिलिन सावंत) | (डॉ.अश्विनी जोशी) | (डॉ. इ सिं चहल) |
| प्रमुख कर्मचारी अधिकारी(प्र) | सह आयुक्त (सा.प्र.) | अतिरिक्त आयुक्त (शहर) | महानगरपालिका आयुक्त |

महानगरपालिका आयुक्तांचे कार्यालय,
क्रमांक:एमओपी/३३६५
दिनांक: दि.२७ सप्टेंबर,२०२३

प्रत----------------------------------------------------------(जादा----------- प्रतीसह)
माहितीकरिता व पुढील आवश्यक त्या कार्यवाहीकरिता कृपया अग्रेषित.

(श्रीम.अ.वि.भिवंदे)
प्रशासकीय अधिकारी (आयुक्त)
महानगरपालिका आयुक्तांचे कार्यालय

RNI No. MAHBIL /2009/31745

सत्यमेव जयते

# महाराष्ट्र शासन राजपत्र

## असाधारण भाग एक—मध्य उप-विभाग

वर्ष ९, अंक ६७] बुधवार, सप्टेंबर २७, २०२३/आश्विन ५, शके १९४५ [पृष्ठे २, किंमत : रुपये ४.००

**असाधारण क्रमांक १०२**

**प्राधिकृत प्रकाशन**

**सामान्य प्रशासन विभाग**

मंत्रालय, मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मुंबई ४०० ०३२, दिनांक २७ सप्टेंबर, २०२३.

**अधिसूचना**

क्रमांक GAD-४९०११/२/२०२३/GAD/DESK-२९.—शासनाने सन २०२३ सालासाठी राज्य शासकीय कार्यालयांना एकूण २४ सार्वजनिक सुट्ट्या परक्राम्य संलेख अधिनियम, १८८१ (१८८१ चा २६) कलम २५ करिता अधिसूचना क्र.सार्वसु ११२२/प्र.क्र.११७/कार्या-२९, दिनांक २ डिसेंबर, २०२२ अन्वये अधिसूचित केल्या आहेत.

२. राज्य शासनाने अधिसूचित केलेल्या २४ सार्वजनिक सुट्ट्यांमध्ये ईद-ए-मिलाद या सणाची सुट्टी गुरुवार, दि.२८ सप्टेंबर, २०२३ रोजी दर्शविण्यात आलेली आहे. ईद-ए-मिलाद हा मुस्लिम धर्मियांचा सण मुस्लिम बांधव मोठ्या प्रमाणात साजरा करत असतात. यावेळी जुलूस कार्यक्रमाचे आयोजन करण्यात येते. तथापि यावर्षी गुरुवार, दि.२८ सप्टेंबर, २०२३ रोजी हिंदु धर्मियांचा अनंत चतुर्दशी हा सण आहे. अनंत चतुर्दशीच्या दिवशी राज्यात सर्वत्र सार्वजनिक गणेश मुर्तीची मोठी मिरवणूक काढण्यात येते व नंतर तिचे विसर्जन करण्यात येत असल्याने हिंदु बांधवांची मोठी गर्दी जमा होत असते. यामुळे दोन्ही समाजामध्ये शांतता व सामाजिक सलोखा कायम राहण्याच्या हेतूने ईद-ए-मिलाद ची सार्वजनिक सुट्टी ही गुरुवार, दि.२८ सप्टेंबर, २०२३ ऐवजी शुक्रवार, दि.२९ सप्टेंबर, २०२३ रोजी जाहीर करण्यात येत आहे.

| अ.क्र. | सुट्टीचा दिवस | इंग्रजी तारीख | भारतीय सौर दिनांक | वार |
|---|---|---|---|---|
| १ | ईद-ए-मिलाद | २९ सप्टेंबर, २०२३ | ७ अश्विन, शके १९४५ | शुक्रवार |

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

**रो. दि. कदम-पाटील,**
शासनाच्या उप सचिव.

क्रमांक : GAD-४९०११/२/२०२३/GAD/DESK-29.
सामान्य प्रशासन विभाग,
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.
दिनांक : २७ सप्टेंबर, २०२३

प्रति,

मा.राज्यपाल यांचे प्रधान सचिव,

मा.राज्यपाल यांचे परिवार प्रबंधक,

मा.सभापती/मा.अध्यक्ष, महाराष्ट्र विधान परिषद/विधानसभा, यांचे सचिव

मा.उप सभापती/मा.उपाध्यक्ष, महाराष्ट्र विधान परिषद/विधानसभा, यांचे खाजगी सचिव

मा.मुख्यमंत्री यांचे अपर मुख्य सचिव, मंत्रालय, मुंबई

मा.उप मुख्यमंत्री (गृह व इतर) यांचे सचिव, मंत्रालय, मुंबई

मा. उप मुख्यमंत्री (वित्त व नियोजन) यांचे सचिव, मंत्रालय, मुंबई

सर्व मा.मंत्री/मा.राज्यमंत्री यांचे खाजगी सचिव /स्वीय सहायक,

मा.विरोधी पक्ष नेता, महाराष्ट्र विधान परिषद / विधानसभा, यांचे स्वीय सहाय्यक,

मुख्य सचिव, सामान्य प्रशासन विभाग, मंत्रालय, मुंबई,

सर्व अपर मुख्य सचिव/प्रधान सचिव/सचिव, सर्व मंत्रालयीन विभाग, मंत्रालय, मुंबई

सर्व मंत्रालयीन विभाग, मंत्रालय, मुंबई

* महाप्रबंधक, उच्च न्यायालय, मुंबई,

* प्राथोनोटरी व सिनियर मास्टर, मूळ शाखा, उच्च न्यायालय, मुंबई

* प्रबंधक, अपील शाखा, उच्च न्यायालय, मुंबई,

* सचिव, महाराष्ट्र लोकसेवा आयोग, मुंबई.

* प्रधान सचिव, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, मुंबई / नागपूर,

* प्रबंधक, लोक आयुक्त व उप लोक आयुक्त यांचे कार्यालय, मुंबई

मुख्य आयुक्त, राज्य माहिती आयोग, मुंबई

मुख्य आयुक्त, सेवा हक्क कायदा, मुंबई

सर्व विभागीय आयुक्त,

सर्व जिल्हाधिकारी,

सर्व जिल्हा परिषदांचे मुख्य कार्यकारी अधिकारी,

मंत्रालयाच्या निरनिराळ्या विभागांखालील सर्व विभाग प्रमुख /कार्यालय प्रमुख,

महालेखापाल, लेखा व अनुज्ञेयता, महाराष्ट्र-१, मुंबई,

महालेखापाल, लेखा व अनुज्ञेयता, महाराष्ट्र-२, नागपूर,

महालेखापाल, लेखापरीक्षा, महाराष्ट्र १, मुंबई,

महालेखापाल, लेखापरीक्षा, महाराष्ट्र २, नागपूर,

उप महालेखापाल, भविष्य निर्वाह निधी कक्ष, मुंबई,

अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई,

निवासी लेखा परीक्षा अधिकारी, मुंबई,

* प्रादेशिक संचालक, महाराष्ट्र आणि गोवा, भारतीय रिझर्व्ह बँक, मुंबई प्रादेशिक कार्यालय, फोर्ट, मुंबई-१,
* मुख्य महाव्यवस्थापक, मानव संसाधन व्यवस्थापन विभाग, भारतीय रिझर्व्ह बँक, मुंबई प्रादेशिक कार्यालय, फोर्ट, मुंबई-१,
* महाव्यवस्थापक, एकात्मिक बँकिंग विभाग, भारतीय रिझर्व बँक, मुंबई प्रादेशिक कार्यालय, फोर्ट,मुंबई-१,
* सचिव, मुंबई पोर्ट ट्रस्ट, मुंबई,

आयुक्त, सर्व महानगरपालिका,

* सर्व राज्यांचे मुख्यसचिव,
* भारत सरकारची सर्व मंत्रालये, नवी दिल्ली,
* महाव्यवस्थापक, मध्य रेल्वे, छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस, मुंबई,
* महाव्यवस्थापक, पश्चिम रेल्वे, चर्चगेट, मुंबई,
* समाहारक, सीमाशुल्क, मुंबई,
* आयकर आयुक्त, मुंबई,
* समाहारक, केंद्रीय उत्पादन शुल्क, मुंबई,
* प्रादेशिक पारपत्र अधिकारी, वरळी, मुंबई,
* विशेष आयुक्त, महाराष्ट्र सदन, नवी दिल्ली,
* संचालक, महाराष्ट्र परिचय केंद्र, नवी दिल्ली,
* व्यवस्थापक, इंडस्ट्रियल डेव्हलपमेंट बँक ऑफ इंडिया, आय.डी.बी.आय.टॉवर, कफ परेड, कुलाबा, मुंबई-०५
* सचिव, भारत निवडणूक आयोग, निर्वाचन सदन, अशोका रस्ता, नवी दिल्ली ११० ००१,
* सचिव, राज्य निवडणूक आयोग, नवीन प्रशासन भवन, मंत्रालयासमोर, मुंबई
* सचिव, इंडियन बँक्स असोसिएशन, स्टेडियम हाऊस, ६ वा मजला, वीर नरीमन रोड, मुंबई-२०,

महासंचालक, माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, मंत्रालय, मुंबई-४०० ०३२ (त्यांना विनंती करण्यात येते की, त्यांनी आवश्यक ते प्रसिध्दीपत्रक निर्गमित करावे, तसेच आकाशवाणी व दूरदर्शनद्वारे प्रसिध्दी द्यावी.)

निवडनस्ती / सामान्य प्रशासन विभाग-२९

* पत्राद्वारे

**अर्जुन गिराम,**
कार्यासन अधिकारी,
सामान्य प्रशासन विभाग.

भाग एक (मु.उ.वि.) १२२२

बृहन्मुंबई महानगरपालिका
आयुक्तांचे कार्यालय
27 SEP 2023
समिति १२, १३, १४, १५, १६, १७, १८
क्रमांक MOP13365